ISSN 2320 – 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची

तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका

(Included in UGC CARE List Group -1)

# अर्थमीमांसा

# (ARTHAMIMANSA)

भारतीय सौर शके १९४५

(जुलै-डिसेंबर २०२३ / खंड १५, अंक २)

************************************ ISSN 2320-0197 **

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका
**(Included in UGC CARE List Group -1)**

# अर्थमीमांसा

# (ARTHAMIMANSA)

भारतीय सौर शके १९४५
(जुलै-डिसेंबर २०२३ / खंड १५, अंक २)

♦ मुख्य संपादक ♦
धीरज सु. कदम

---

♦ संपादक मंडळ ♦
श्रीनिवास खांदेवाले
दि. व्यं. जहागिरदार
प्रतिभा काळमेघ
सुनील शिंदे
आशिष महातळे

---

♦ संपादकीय पत्रव्यवहार ♦
धीरज सु. कदम
फ्लॅट नं - २०१, श्रीकृपा हाईट्स,
मानवसेवा नगर, सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६
मो. नं. ९९२२२८१५४१
इमेल : dhiraj.kadam@gmail.com

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
## (२०२३-२४)


- **कार्याध्यक्ष**
  डॉ. एच. ए. हुद्दा

- **अध्यक्ष**
  डॉ. करमसिंग राजपूत

- **उपाध्यक्ष**
  डॉ. राजू श्रीरामे

- **सचिव**
  डॉ. संजय कोठारी (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)

- **प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'**
  डॉ. धीरज सु. कदम

- **जिल्हानिहाय प्रतिनिधी:**
  डॉ. माधुरी लेने (नागपूर शहर)
  डॉ. सुनील शिंदे (नागपूर ग्रामीण)
  डॉ. विठ्ठल ठावरी (चंद्रपूर)
  डॉ. श्रीकृष्ण भुरे (भंडारा)
  डॉ. श्रीकृष्ण बोढे (वर्धा)
  डॉ. मंगला धोरण (अमरावती)
  डॉ. पंकज तायडे (अकोला)
  डॉ. हनुमंत भोसले (बुलढाणा)
  डॉ. संजय राचलवार (यवतमाळ)
  डॉ. गजानन कुबडे (वाशीम)
  डॉ. संजय महाजन (गडचिरोली)
  डॉ. वर्षा गंगणे (गोंदिया)


**आजीव सदस्यता शुल्क :** रू. १५०० /- आहे, ही रक्कम सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने, सहयोगी प्राध्यापक, श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा यांचेकडे "विदर्भ अर्थशास्त्र परिषद" या नावाने डिमांड ड्राफ्टने पाठवावी किंवा डॉ. विठ्ठल घिनमिने यांच्याशी ९६८९६४२४४९ या नंबरवर संपर्क साधावा.

**स्वागत मूल्य:**

१) परिषद सभासद - २५० रू.

२) शैक्षणिक संस्था – ३५० रू.


- **अक्षर जुळवणी व मुद्रक**
  आयडियल कॉम्पुटर (महादेव कामतकर)
  नागपूर, मो. नं. ९०२१६७४८९१
  इमेल : kamatkarmahadeo@gmail.com

# अनुक्रमणिका (INDEX)


- स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि आधुनिक ग्रामविकासाची दिशा- अध्यक्षीय भाषण
  - श्रीराम कावळे ........................१
- विदेशी गुंतवणूक आणि भारतीय अर्थव्यवस्था
  - मृणालिनी फडणवीस ......................१०
- अमृतकाळातील आत्मनिर्भर भारत
  - करमसिंग राजपूत.........................१६
- Reflection on Development of Digital Labour Research
  - Aparna Samudra ....................२२
- Gig Economy: Emerging Dimensions with Reference to the Digital Crowd Work
  - Amit Joshi &
  - Dharmendra Mehta ............३४
- Export Potential of Indian Basmati Rice with Global World: An Analytical Approach
  - Naresh Kumar ........................४३
- Export Prospect and Performance of APEDA Products: A Study in the State of Assam
  - Barsha Kalita &
  - Pranjal Pratim Dutta.................४०
- A Study on the Living Conditions and Status of Shifting Cultivators in Tripura
  - Sukanta Sarkar ..................६३
- Ineffectiveness of State Finance Commission: An Analysis of Their Impact on Fiscal Decentralization and Local Governance
  - Jagdeep Kumar &
  - Parul Ratra ............................७१
- Inter-District Disparities in Health Infrastructure in Haryana
  - Priya Kadian &
  - Rajesh Kundu ....................८१
- Reflection of Delays in Redressing Corporate Insolvency- Economic Analysis
  - Payal Thaorey,
  - Yogendra Singh &
  - Padma Ghatame.................९२
- Edge and Ambiguity of Digital Payments in the Ambience of India
  - Channaveerayya Hiremath
  - Shivakumar Deene
  - Bondita Saikia &
  - Trinadh Nookathoti.............१०३
- A Comparative Study of Public and Private Personal Accidental Insurance Sector in India
  - Lalee Sharma &
  - Dharminder Singh ..............११२
- आनंदाच्या स्थितीची मीमांसा: संदर्भ आनंद निर्देशांक अहवाल २०२३चा
  - पंकज तायडे ...................... १२२
- वैश्वीकरण : वर्तमान परिप्रेक्ष्य में वैश्विक संस्कृतियों का नवीनीकरण
  - प्रगति दूबे ........................१२८


**ग्रंथ परिचय**


- आर्थिक तत्त्वज्ञान – जोन रॉबिन्सन (Economic Philosophy- by Joan Robinson)
  - धीरज कदम ........................१३३

# आनंदाच्या स्थितीची मीमांसा: संदर्भ आनंद निर्देशांक अहवाल-२०२३

**पंकज तायडे**
सहयोगी प्राध्यापक
भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,
पिंजर जि. अकोला

**गोषवारा-**

विकास करणे हे अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट असते. राष्ट्रीय उत्पन्न वाढणे राष्ट्रासाठी आनंददायी बाब आहे. पण अश्या स्थितीत अर्थव्यवस्थेतील नागरिक आनंदी आहेत का?. या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असेल तर राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याला काही अर्थ राहत नाही. याच अनुषंगाने एखाद्या राष्ट्राची प्रगती मोजण्यासाठी त्या राष्ट्रातील लोकांच्या आनंदाचा स्तर लक्षात घेणे आवश्यक ठरते असा विचार मान्यता पावत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने २० मार्च २०२३ ला १२ वा 'जागतिक आनंद अहवाल' प्रकाशित केला. या अहवालातून विविध राष्ट्रातील आनंदाची अवस्था स्पष्ट होते. भारताचा १३७ देशांच्या यादीत १२६ वा क्रमांक असल्याचे या अहवालात दिसते. भारताचे शेजारी देश नेपाळ ७८, बांग्लादेश ११८, पाकिस्तानने १०८ तर श्रीलंका ११२ व्या स्थानी आहे. भारत जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था असतांना भारताच्या आनंदाचा स्तर कमी का? या प्रश्नाची कारणमीमांसा करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंचा थोडक्यात आढावा प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे. संपत्ती आणि आनंद यांचा परस्पर संबंध आहे. अश्या स्थितीत भारतात मूठभर लोकांकडे एकवटलेली श्रीमंती आणि बहुसंख्य लोकसंख्येतील गरिबी हे आनंद अहवालात स्थान घसरण्याचे प्रमुख कारण आहे. गरिबी, भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य सुविधांचा दर्जा, मानसिक आरोग्यासाठी पोषक आणि पूरक सामाजिक सलोख्याचे वातावरण नसणे अशा अनेक बाबी या भारतीयांना आनंदी राहण्यापासून दूर ठेवणाऱ्या ठरत असल्याचे या अहवालाच्या निमित्ताने सांगण्यात येते.

**बीज शब्द** - आनंद निर्देशांक, आर्थिक विकास, आनंदाचे मोजमाप, विकासाचे मोजमाप, दरडोई उत्पन्न

**प्रस्तावना-**

मनुष्याला जीवनात आनंद मिळत असेल तर सुखाची अनुभूती होते. सुखी जीवन लाभणे म्हणजे दैनंदिन जीवन जगताना जीवनावश्यक गरजांसह चैनीच्या गरजा सुद्धा काही प्रमाणात पूर्ण होणे होय. चैनीचे जीवन शक्यच नसल्यास किमान दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे. मनुष्याचा, संस्थेचा अथवा एखाद्या देशाचा विकास त्यांच्या आनंदात समाविष्ट असतो. एकवीसाव्या शतकात प्रत्येक देश विकास साधण्यासाठी प्रयत्नरत आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा स्तर वाढवल्यास आर्थिक विकास घडून येतो हे सर्वश्रुत आहे. राष्ट्रीय उत्पन्न तसेच दरडोई उत्पन्न वाढणे ही एखाद्या राष्ट्रासाठी आनंददायी बाब आहे. पण अश्या स्थितीत अर्थव्यवस्थेतील नागरीक आनंदी आहेत का?. या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असेल तर राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याला काही अर्थ राहत नाही. याच अनुषंगाने एखाद्या राष्ट्राची प्रगती मोजण्यासाठी त्या

राष्ट्रातील लोकांच्या आनंदाचा स्तर लक्षात घेणे आवश्यक ठरते, असा विचार सद्यस्थितीत स्थिरावतो आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने २० मार्च २०२३ रोजी १२ वा 'जागतिक आनंद अहवाल' प्रकाशित केला. या अहवालातून विविध राष्ट्रातील आनंदाची अवस्था स्पष्ट होते. दरडोई उत्पन्न, आरोग्य, जगण्याचे स्वातंत्र्य, औदार्य, पारस्परिक किंवा सामाजिक सहकार्य आणि भ्रष्टाचार या निकषांच्या आधारावर भारताचा १३७ देशांच्या यादीत १२६ वा क्रमांक असल्याचे या अहवालात दिसते. भारतीय नागरिकांचा आनंदाचा स्तर खूपच कमी असल्याचे सदर क्रमांक सूचित करतो. भारत जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. भारतीय अर्थव्यवस्था अनेक क्षेत्रात प्रगती करतांना दिसते. तरी सुद्धा आनंदाच्या अहवालातील खालच्या क्रमवारी मुळे विकासाच्या स्थितीची चिंता निर्माण होते. याच वर्षात प्रकाशित जागतिक भूक निर्देशांक अहवाल भारतातील भूक बळींची स्थिती गंभीर असल्याचे अधोरेखित करतो. जगातील १२५ देशांच्या क्रमवारीत भारताचा १११ वा क्रमांक याला पुष्टी देतो. अश्या स्थितीत नागरिक आनंदी राहू शकत नाहीत. प्रस्तुत लेखात जागतिक आनंद अहवालातील भारताच्या नीचांकी क्रमवारीची कारणमीमांसा भारतीय अर्थव्यवस्थेच्या सद्य:स्थिती च्या आधारे करण्यात आली आहे.

**संशोधनाचा उद्देश आणि पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधात यावर्षी प्रकाशित जागतिक आनंद अहवाल २०२३ च्या निमित्ताने भारतीय लोकांच्या आनंदाची न्यूनतम पातळीवर असलेल्या क्रमवारीची कारणमीमांसा करण्याचा प्रमुख उद्देश आहे. याच अनुषंगाने खालील मुलभूत उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

**उद्देश**

- जागतिक आनंद अहवाल २०२३ चा आढावा घेणे.
- भारतात अन्न, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सलोखा या मुलभूत गरजांची काय स्थिती आहे याचा आढावा घेणे.
- उपरोक्त मुद्दा क्रमांक दोन च्या अनुषंगाने आनंदाच्या निर्देशांकाचे विश्लेषण करणे'

सदर शोधनिबंध लिहितांना द्वितीय समंकाचा वापर करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास उपाययोजना यंत्रणेने प्रकाशित केलेल्या वार्षिक आनंद अहवाल २०२३ याचा प्रमुख स्रोत म्हणून उपयोगात आणला आहे. याशिवाय इतर प्रकाशित साहित्य तथा काही संकेस्थळवर प्रकाशित माहितीचा सुद्धा वापर योग्य विश्लेषणासाठी केला आहे.

**जागतिक आनंद अहवालाची उत्पत्ती**

कोणत्याही देशाच्या प्रगतीचा स्तर निश्चित करण्यासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनाचे (Gross Domestic Production- GDP) मोजमाप केले जाते. उत्पन्नातील सकारात्मक बदल अर्थव्यवस्थेचा विकास तर नकारात्मक बदल अर्थव्यवस्थेची अधोगती स्पष्ट करते. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे चिन्ह आहे. वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या स्थितीत देशातील नागरिकांच्या आनंदाची स्थिती कशी राहते ही बाब सुद्धा महत्वाची आहे. देशाची प्रगती केवळ सकल राष्ट्रीय उत्पादनावर नव्हे तर त्या देशातील जनतेच्या आनंदाच्या स्थितीवर आधारित असते. सर्व सोयी सुविधा प्राप्त असणारे नागरिक आनंदी असतात. भूतान देशाचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचूक यांनी देशाचा विकास नागरिकांच्या

आनंदात समाविष्ट असतो असे मत १९७० च्या दशकात मांडून आनंद निर्देशांक मोजण्याची गरज व्यक्त केली. तेव्हापासून सकल देशांतर्गत आनंद (Gross Domestic Happiness) मोजण्यास सुरुवात झाली. या संकल्पनेने देश किंवा समाजात विकासपर्व निर्मितीसाठी नागरिकांचे आनंदी राहणे हा मार्ग जगाच्या मनावर ठसवला. अनेक अर्थतज्ञ अर्थव्यवस्थेचा विकास त्या देशातील नागरिकांना मिळणाऱ्या आनंदात मोजणे अधिक चांगले राहील असे मत व्यक्त करीत आहेत.

अमर्त्य सेन आणि मेहबूब उल हक यांनी मानव विकास मोजून अर्थव्यवस्थेच्या विकासाचे स्वरूप स्पष्ट करावे असा विचार १९९० साली व्यक्त केला. उत्तम आरोग्य व शिक्षण आणि उच्चतम जीवनमानाचा दर्जा मानवाचा विकास करतो. मानवी विकास झाला की अर्थव्यवस्थेचा विकास होतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढले कि विकास झाला असे समजणे चुकीचे ठरू शकते. जगातील पाचवी समृद्ध अर्थव्यवस्था म्हणून शेखी मिरवणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत आजही २९ टक्के लोक शिक्षण, पर्याप्त आरोग्य सुविधा व इतर सुख सोयी पासून दूर आहेत. युएनडीपी ने पहिला 'मानव विकास निर्देशांक' अहवाल १९९० साली प्रकाशित केला. याच संकल्पनेशी जुळणारे विचार भूतान च्या राज्याचे होते. सत्तरच्या दशकातील आनंदाचे मोजमाप करण्याचा विचार संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ मध्ये स्वीकारला. तेव्हापासून २० मार्च हा दिवस 'जागतिक आनंद दिवस' म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. सुमारे ११ वर्षांपासून दरवर्षी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकास उपाययोजना कार्यक्रम अंतर्गत जगातील देशांच्या आनंदाचे मूल्यमापन करणारा जागतिक आनंद अहवाल प्रकाशित केला जातो. वैश्विक पातळीवर अनेक अर्थव्यवस्था हा अहवाल विकासाची स्थिती जाणून घेण्याच्या माध्यमातून महत्वपूर्ण ठरणार याबाबत गांभीर्याने विचार करीत आहेत.

**जागतिक आनंद अहवाल २०२३**

अहवाला नुसार 'फिनलंड' हा जगातील सर्वात आनंदी दिवस ठरला. मागील अकरा वर्षाच्या कालावधीत फिनलंड ने हे स्थान सहाव्यांदा मिळवले आहे. एकूण १३७ देशांनी आनंद सर्वेक्षणात भाग घेतला होता. या मध्ये भारताचा १२६ वा क्रमांक आहे. जो मागील वर्षीच्या तुलनेत १० ने कमी झाला आहे. तरी सुद्धा भारताचा क्रमांक या यादीच्या तळाशीच असल्याचे दिसते. डेन्मार्कने मागील वर्षीप्रमाणेच यंदाही या क्रमवारीत दुसरे स्थान कायम राखले आहे. मागील वर्षी चौथ्या क्रमांकावर असलेल्या आइसलँडने यंदा तिसरे स्थान मिळवले आहे. चौथा क्रमांक इस्राइल तर पाचव्या क्रमांकावर नेदरलँड आहे. अत्यल्प प्रमाणात असलेली गुन्हेगारी, अपरिमित निसर्ग सौंदर्य आणि त्याचे संवर्धन, उत्कृष्ट आरोग्य सुविधा, सहकार्य आणि एकोप्याने जीवन जगण्यास प्राधान्य व सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरिबीचे प्रमाण अत्यंत कमी, या कारणांमुळे फिनलंड हा देश सलग सहाव्या वर्षी जगातील सर्वात आनंदी देश ठरला असल्याचे अहवालावरून स्पष्ट होते.

आनंदाचे प्रमाण कमी म्हणजे दुःख जास्त हे स्पष्टच आहे. दुःख जास्त असलेल्या देशांच्या यादीत भारत गणल्या जातो. यंदाच्या अहवालात भारताने १२६वे स्थान पटकावले आहे. तालिबानच्या अन्यायाच्या झळा सोसणारा अफगाणिस्तान मागील वर्षी १४६व्या क्रमांकावर होता तो यंदा १३७व्या क्रमांकावर आहे. मागील वर्षीप्रमाणेच यंदाही भारताचे इतर शेजारी देश या अहवालात भारतापेक्षा वरचे स्थान राखून आहेत. नेपाळने ७८वे, बांग्लादेशने ११८वे,

पाकिस्तानने १०८वे तर श्रीलंकेने महागाईच्या झळा सोसल्यानंतरही ११२वे स्थान प्राप्त केले आहे. युक्रेन आणि रशिया यांच्या मागील वर्षभर युद्ध सुरु आहे तरीसुद्धा युक्रेन ९२व्या तर रशिया ७०व्या स्थानावर आहेत. ही अहवालातील सगळयात धक्कादायक माहिती आहे. भारतात दिवसेंदिवस रोजगार संधी कमी होणे, शिक्षण व आरोग्य विषयक पर्याप्त सुविधांचा अभाव, भ्रष्टाचाराचा उद्रेक तसेच सामाजिक सौहार्दाचा अभाव या कारणांमुळे भारतीय लोक आनंदापासून दूर असल्याचे या अहवालातील निरीक्षणांवरून स्पष्ट होत आहे.

**आनंद मोजण्याचे निकष**

कोणत्याही देशातील नागरिकांचा आनंद कसा मोजावा यासाठी काही निकषांची निश्चिती केली आहे. संयुक्त राष्ट्र संघटन जागतिक आनंद अहवाल तयार करताना विशिष्ट निकषांचा आधार घेते. प्रत्येक व्यक्तीला होणारा आनंद ही पूर्णपणे सभोवतालच्या घडामोडींवर अवलंबून असते. सलग सहा वर्षे सूर्यदर्शन न होणाऱ्या फिनलंडच्या लोकांना सूर्योदय ही अतिआनंदाची बाब ठरेल तर भारतीयांना हे तर नेहमीचे वाटल्याने त्यात आनंद होणार नाही. पर्यायाने आमचा आनंद शून्य व त्यांचा १०० प्रतिशत असेल. अशा सर्व अडचणींचा विचार करून १५० देशांची निवडक प्रश्नांच्या आधारे निवडक लोकांचा 'आनंद' मोजणारी यंत्रणा केवळ एकच नाही तर त्यामध्ये गॅलप सर्वेक्षण, वर्ल्ड व्हॅल्यू सर्वेक्षण अशा मापन व्यवस्था कार्य करतात. यासाठी आनंद पातळी ० ते १० अशी मापन शिडी वापरली जाते. विविध चौदा उपघटकांवर आधारित प्रश्नांची प्रश्नावली तयार केल्या जाते. त्यामध्ये मुख्यत्वे ज्या सहा प्रश्नांवर 'आनंद' मापन होते त्यात दरडोई उत्पन्न, आरोग्य, जगण्याचे स्वातंत्र्य, औदार्य, पारस्पारिक किंवा सामाजिक सहकार्य आणि भ्रष्टाचार या घटकांचा समावेश होतो. सदर निकषांच्या माध्यमातून विविध देशातील लोकांना आपण 'आनंदी' आहोत का? याचे उत्तर शोधता येते.

पर्याप्त उत्पन्न जीवनमनाचा दर्जा निश्चित करते. त्यामुळे पुरेसे उत्पन्न आनंदाची पहिली पायरी ठरते. केवळ वर्तमान उत्पन्न स्थिती लक्षात न घेता उत्पन्नाची भविष्यकालीन स्थिरता राहील किंवा नाही ही शक्यतासुद्धा आनंदावर परिणाम करते. जेथे लोकांचे उत्पन्न सातत्याने अधिक राहते अशा प्रगत राष्ट्रांत आनंदाची तीव्रता अधिक असते. जर मंदी तसेच युद्ध सदृश स्थिती असल्यास उत्पन्न घटण्याची शक्यता निर्माण होवून आनंद घटतो.

आरोग्याची स्थिती हा दुसरा घटक आनंद मापन करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचा ठरतो. आरोग्यासाठी असणारी यंत्रणा आरोग्य खर्चात सरकारचा सहभाग व लोकांचा त्याबाबतचा अनुभव यावर आनंदाची तीव्रता अवलंबून असते. उत्तम आरोग्य व उच्च उत्पन्न याचा वापर करून व्यवसाय निवडणे शक्य होते. यामुळे आनंद द्विगुणीत होतो.

दैनंदिन जीवन जगण्याचे स्वातंत्र्य कसे आहे हा तिसरा निकष आनंद अहवाल तयार करताना आणखी महत्वाचा ठरतो. जीवन जगताना राजकीय तसेच धार्मिक प्रतिबंध असतील तर आनंद मिळत नाही. तर दुखः होते.

त्याचप्रमाणे आपत्कालीन व मंगलप्रसंगी शासन, मित्र, नातेवाईक तसेच परीजानांचे औदार्य आपले सामाजिक जीवन समृद्ध करीते. सामाजिक पाठबळ हि प्राथमिक गरज आहे. आपसातील वैरत्व आनंद घटवते.

आपणास जसे मिळाले तसे इतरांनाही मिळावे त्यांना मिळत नसल्यास आपल्यातील काही भाग मदत रूपात देवून सहकार्य करण्याची भूमिका ज्या व्यवस्थेत

असते तिथे आनंदाची परमोच्च पातळी राहते. एकमेकास सहकार्य करण्याची काय स्थिती आहे हि आनंद मापन शिडीतील महत्वाचा निकष आहे.

नाकारीकांचा नियमित कामकाज करतांना संपर्कात येणारी व्यवस्था कशी आहे यावर देखील आनंद अवलंबून असतो. शासनव्यवस्था पारदर्शी, गतिमान, आवश्यक सामाजिक सोयी-सुविधा पुरवणारी असावी. अशी अर्थव्यवस्था भ्रष्टाचारमुक्त आहे असे समजले जाते. भ्रष्टाचार मुक्त व्यवस्थेत जगताना लागणाऱ्या सोयी सुविधा सहज प्राप्त करता येतात. अश्या प्रसंगी नागरिक आनंदी राहतात. म्हणून देशातील व्यवस्था भ्रष्टाचार मुक्त असणे हा सहावा आणि महत्वपूर्ण निकष आहे.

**भारताच्या आनंदक्रमाची कारणमीमांसा**

भारतीय लोकांच्या आनंदाचा जागतिक क्रम १२६ वा आहे. १३६ देशात १२६ वे स्थान म्हणजे शेवटून ११वा क्रमांक लागतो. कोरोनास्थिती हाताळण्यात भारताने उत्तम कामगिरी केली. तसेच जागतिक वित्तीय चलनवाढ संकटावर सुद्धा मात करण्यात यश मिळवले. तरी जागतिक आनंद मापन निकषांबाबत नागरिकांना मिळणारा आनंद चांगल्या स्तरावर नाही. राष्ट्रीय उत्पन्न वाढ तसेच दरडोई उत्पन्न वाढ समाधानकारक आहे. तरीसुद्धा आरोग्य, सार्वजनिक सलोखा तसेच धार्मिक सुसंवाद, पारस्पारिक सहकार्य आणि भ्रष्टाचाराबाबत असणारे लोकमत यांची एकत्रित गोळाबेरीज ही आनंदक्रम घटवण्यास कारक ठरली असावी असे वाटते.

आरोग्य विषयक सेवांचा विचार करता सद्यस्थितीला भारतात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आकडेवारी नुसार डिसेंबर २०२२ ला भारतात ८३४ नागरिकांमागे १ डॉक्टर ही चिंताजनक स्थिती होती. दर्जेदार आरोग्यविषयक सुविधा सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होत नाहीत. प्रसंगी खाजगी क्षेत्रात मोठी रक्कम चुकवून आरोग्य सुविधा प्राप्त कराव्या लागतात. अश्या स्थितीत नागरिकांचा आनंद स्तर कमी होतो.

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न समाधानकारक गतीने वाढत आहे. आर्थिक वर्षे २०२२-२३ मध्ये प्रतिमाणशी दरडोई उत्पन्न रु. १,७२,००० आहे. सदर वाढ २०१४-१५ च्या तुलनेत ९९ टक्के आहे. वाढलेलं राष्ट्रीय उत्पन्न देशातील केवळ १० टक्के लोकांमध्ये वितरीत होत आहे. राष्ट्रीय उत्पन्न वितरण करणारी व्यवस्था इतर नागरिकांचा आनंदाचा स्तर घटवते. मथ्यू ए. किलिंग्जवर्थ यांनी एक संशोधन करून आपला अहवाल प्रकाशित केला ज्यात 'मनुष्य जितके जास्त पैसे प्राप्त करू शकेल तितका जास्त आनंदी राहील'. पैसा सगळ्या सुखाचे स्रोत आहे. म्हणून पैसा जास्त आल्यास सुख जास्त आणि सुख जास्त म्हणजे आनंद जास्त. म्हणून महत्तम आनंदासाठी लोकांचे उत्पन्न जास्त असावे. यासाठी देशात पारदर्शक उत्पन्न वितरण व्यवस्था असली पाहिजे.

जीवनावश्यक गरज असलेल अन्न नियमित, पौष्टिक आणि पर्याप्त स्वरुपात मिळणे आवश्यक आहे. विविध सर्वेक्षणानुसार भारतात आजही २५ ते ३० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहतात. रोजच्या जगण्यासठी अन्न मिळवण्यासाठी धडपडतात. असे लोक आनंदी कसे राहू शकतात? आणि अशी अर्थव्यवस्था विकसित होत आहे असेही म्हणता येणार नाही.

बेरोजगारीचे वाढते प्रमाण आनंदाचा स्तर कमी करण्यास कारणीभूत ठरत आहे. मार्च २०२३ मध्ये ७.८० टक्के एवढा बेरोजगारीचा दर आहे. २०१० साली १९.४७% असणारे तरुणांच्या

बेरोजगारीचे प्रमाण २०२१ मध्ये २८.२६% पर्यंत वाढले. भारत तरुणांचा देश म्हणून ओळखल्या जातो. अश्या देशा इतक्या मोठ्या प्रमाणात तरुण बेरोजगार असणे दुखःदायक आहे.

सामाजिक सलोखा व धार्मिक भावना राखण्याच्या निरंतर प्रयत्न भारतातील लोक करीत असतात. भारत हा विविध जाती धर्मांच्या लोकांचा देश आहे. देशात राजकीय वर्चस्व प्राप्त करण्यासाठी धर्माचा वापर बऱ्यापैकी होतांना दिसतो. अनेक राजकीय पक्षांची विचारधारा विशिष्ट जाती धर्माच्या समुदायास पोषक असल्याचे दिसते. राजकीय कुरघोडी करण्यासाठी जाती धर्मांमध्ये तणाव निर्माण होतांना दिसतो. अश्या स्थितीत सामाजिक सलोखा राहत नाही. वाद-विवाद निर्माण होवून वातावरण तणावपूर्ण होते. अश्या स्थितीत आनंदाचा स्तर खालावतो.

जगभरातील भ्रष्टाचारी देशांचा विचार करता भारताचा १८० देशांच्या यादीत ८५ वा क्रमांक लागतो. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल करप्शन परसेप्शन इंडेक्स या अहवालात ही प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर अहवाल भारतातील भ्रष्टाचाराच्या स्थितीची विदारक स्थिती स्पष्ट करतो. गरीब नागरिकांची मोठी संख्या देशात आहे. कल्याणकारी योजना सुद्धा राबवल्या जातात. मात्र असे लाभ मिळवण्यासाठी गरिबांना भ्रष्ट प्रवृत्तींचा सामना करावा लागतो. हि दुखःद बाब आहे.

प्रत्येक देशाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय स्थिती, लोकसंख्या तसेच नागरिकांचे उत्पन्न या सर्वांचा एकत्रित परिणाम आपल्या आनंदाचा षटकोन ठरवतो. आनंदमार्गावर प्रवास करण्यासाठी अक्षरश: मैलोगणती अंतर पार करणे आवश्यक असल्याचे विदारक वास्तव आनंदाची जागतिक क्रमवारी दर्शवते.

संपत्ती आणि आनंद यांचा परस्पर संबंध आहे. अश्या स्थितीत भारतात मूठभर लोकांकडे एकवटलेली श्रीमंती आणि बहुसंख्य लोकसंख्येतील गरिबी हे आनंद अहवालात स्थान घसरण्याचे प्रमुख कारण आहे. गरिबी, भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य सुविधांचा दर्जा, मानसिक आरोग्यासाठी पोषक आणि पूरक सामाजिक सलोख्याचे वातावरण नसणे अशा अनेक बाबी या भारतीयांना आनंदी राहण्यापासून दूर ठेवणाऱ्या ठरत असल्याचे या अहवालाच्या निमित्ताने सांगण्यात येते.

**संदर्भ:-**


1. SDSN (2023). *World Happiness Report 2023: Sustainable Development Solution Network*. New York
2. WHH (2023). *Global Hunger Index 2023: The Power of Youth in Shaping Food System. Welt Hunger Hilfe*. Bonn Dublin 2023
3. https://www.loksatta.com/explained/world-happiness-index-india-ranks-125-below-pakistan-finland-tops-print-exp-pmw-88-3540992/
4. https://tarunbharat.com/poverty-of-joy/
5. https://marathi.abplive.com/news/india/transparency-international-report-india-ranks-85th-among-180-countries-in-global-corruption-index-1028724


***

UGC-CARE List

You searched for "**Social Sciences**". Total Journals : **434**

Search:

| Sr.No. | Journal Title | Publisher | ISSN | E-ISSN | UGC-CARE coverage year | Details |
|---|---|---|---|---|---|---|
| 21 | Anvesak | Sardar Patel Institute of Economic and Social Research | 0378-4568 | NA | from June - 2019 to Present | View |
| 22 | Apeejay Journal of Management and Technology | Apeejay Institute of Management and Engineering Technical Campus | 0974-3294 | NA | from April - 2022 to Present | View |
| 23 | Appeal: Review of Current Law and Law Reform | Faculty of Law, University of Victoria | 1205-612X | 1925-4938 | from June - 2019 to Present | View |
| 24 | Applied Economics Quarterly | Duncker and Humblot GmbH | 1611-6607 | 1865-5122 | from June - 2019 to January - 2020 | Indexed in Scopus |
| 25 | Applied Finance Letters | Auckland University of Technology | 2253-5799 | 2253-5802 | from June - 2019 to September - 2019 | Discontinued from Sept. 2019 |
| 26 | Arab Economic and Business Journal | Elsevier | 2214-4625 | NA | from June - 2019 to July - 2020 | Discontinued from July 2020 |
| 27 | Army Institute of Law Journal | Army Institute of Law | 0975-8208 | NA | from June - 2019 to Present | View |
| 28 | Art Libraries Journal | Cambridge University Press | 0307-4722 | 2059-7525 | from June - 2019 to Present | View |
| 29 | Artha Vijnana | Gokhale Institute of Politics and Economics | 0971-586X | NA | from June - 2019 to Present | View |
| 30 | Arthamimansa | Vidarbha Arthashastra Parishad | 2320-0197 | NA | from July - 2023 to Present | View |

Showing 21 to 30 of 434 entries

Previous 1 2 3 4 5 … 44 Next

**Copyright © 2024 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Arthamimansa |
| **Journal Title (in Regional Language)** | अर्थमीमांसा , अर्थमीमांसा |
| **Publication Language** | English , Marathi , Hindi |
| **Publisher** | Vidarbha Arthashastra Parishad |
| **ISSN** | 2320-0197 |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Social Science |
| **Subject** | Economics, Econometrics and Finance (all) |
| **Focus Subject** | General Economics, Econometrics and Finance |
| **UGC-CARE coverage years** | from July-2023 to Present |

**Copyright © 2024 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**